## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३२४४/२०२४

**अपिलार्थी, श्री.सुनिल मेघराज कांकरिया**
ए/२०३, नव संस्कारधाम को.ऑ.हौ.सो.,
लालचौकी, आग्रारोड, सुर्यकिरण गॅरेज हॉल समोर,
मु.पो.ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (अबांनि),
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य हॉल, पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य हॉल, पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ११.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०१.२०२३ | — | ३१.०३.२०२३ | ०३.०५.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. ०२.०९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.धनंजय थोरात, सहाय्यक आयुक्त तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ज्ञानेश्वर कंखरे, अधीक्षक व श्री.बसवंत श्रीपती बजागे, प्र.अधीक्षक, ३/क प्रभाग समिती, कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" कार्यालयीन जाक्र.कडोंमपा/३कप्रक्षे/अबांनि/११० दि.२४.०४.२०१८ पत्रक मधील संदर्भ क्र.१ ते ३ माहिती सत्यप्रत मिळण्याबाबत.*

1) *कार्यालयीन जा.क्र.कडोंमपा/ ३ क प्रक्षे/अबांनि/ ११०, दि.२४.०४.२०१८ पत्रक मधील संदर्भ क्र. १ ते ३ माहिती सत्यप्रत मिळावी.*
2) *दि.२४/०८/२०१८ रोजीचे मालमत्ता क्र.C01000558900, C01000254200, C01000559500, C01000521800 छाया टॉकिज व उमरीकर चाळ या नावाने ओळखली जाणारी तळ मजला इमारत कार्यालयीन नोंद संबंधित पक्षकार किंवा अॅडव्होकेट मार्फत केलेला पत्रव्यवहार व कार्यालयीन टिप्पणची माहिती दि.०८/०२/२०१८ ते दि.१७/०१/२०२३ पर्यंत कालावधी सत्यप्रत माहिती मिळावी.*
3) *छाया ऑकिजकडून कार्यालयीन हस्ते पोहचं मागणी अर्ज दि.०२/०५/२०१८ रोजीचा कार्यालयीन जमा दि.०३.०५.२०१८ व क्रमांक १२२१ संबंधित पुर्तता माहिती सत्यप्रत मिळावी."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०२.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु.११६/- भरणेबाबत कळविले होते. सदर शुल्काचा भरणा देखील केला आहे. त्यानंतरसुध्दा आपणास माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रथम अपील दाखल झाले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२५.०४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, दि.०३.०५.२०२३ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली आहे. तथापि या व्यतिरिक्त अनधिकृत बांधकाम विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती

अपिलार्थी यांना १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशामध्ये जरी असे नमूद केलेले असले तरी प्रत्यक्षात आपणास कोणतीच माहिती देण्यात आलेली नव्हती, असे अपिलार्थी यांनी आपले युक्तीवादात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याबाबतचा कोणताही पुरावा आपल्याकडे उपलब्ध नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही. आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामुल्य पुरविणे योग्य होईल. तसेच अपिलार्थी यांचेकडून यापूर्वी भरणा करुन घेतलेले माहितीचे शुल्क त्यांना पुन्हा धनादेशाद्वारे परत करण्यात यावे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. अपिलार्थी यांचेकडून यापूर्वी भरणा करुन घेतलेले माहितीचे शुल्क रु.११६/- इतके त्यांना पुढील १५ दिवसात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी धनादेशाद्वारे परत करावे.
३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुखदेव धापोडकर (सेवानिवृत्त), अधीक्षक (अबांनि) ३/क प्रभागक्षेत्र, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १८.०१.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुखदेव धापोडकर (सेवानिवृत्त), अधीक्षक (अबांनि) ३/क प्रभागक्षेत्र, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.
**-यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (अबांनि),
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य हॉल, पहिला मजला,
सांगळेवाडी, कल्याण (प.),ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.
**-यांचे मार्फत प्रत रवाना.**